# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक

सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवकांना कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ६८ वा वर्धापनदिन शुक्रवार दिनांक १० फेब्रुवारी २०१७ रोजी संपन्न होत आहे. त्या प्रित्यर्थ शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवकांचे सांस्कृतिक मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

या परिपत्रकाव्दारे असेही कळविण्यात येते की, जे शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवक सांस्कृतिक कार्यक्रमामधे भाग घेऊ इच्छित आहेत अशा शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवकांनी आपल्या विभागप्रमुखांमार्फत तसा अर्ज दिनांक ०४ फेब्रुवारी २०१७ पूर्वी श्रीमती मेघना माटे, उपकरणशास्त्र विभाग यांच्याकडे पाठविणे आवश्यक आहे.

सोमवार, दिनांक ०६ फेब्रुवारी २०१७ रोजी दुपारी ४.00 ते ६.00 या वेळेत सदर कार्य क्रमात भाग घेऊ इच्छिणा—या शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवक हे सादर करणा—या सांस्कृतिक /मनोरंजनाचे कार्यक्रमाची रंगीत तालीम होणार असून गुरूवार, दिनांक ०९ फेब्रुवारी २०१७ रोजी दुपारी ४.00 ते ६.00 या वेळेत अंतिम रंगीत तालीम होणार आहे, याची नोंद घेण्यात यावी.

या सांस्कृतिक कार्यक्रमामधे सहभागी होणा—या शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सेवकांना सदर कार्यक्रमात सहभागी झाल्याबाबतचे विद्यापीठाचे प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

(डॉ. नरेंद्र कडू)
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११००७
जावक क्र. आर/2/55
दिनांकः ३१.०१.२०१७

प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठीः
१. सर्व संबंधित विभागप्रमुख}
२. सर्व संबंधित शाखाप्रमुख}

सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावे.